# समर्पण पत्रिका

‘‘काही उगवत नसेल तर पेरायच कशाला,
इतक्या गलितगात्र झालेल्या माझ्या मनाच्या
मातीला तुझ्या काळोखाच्या गर्भातून
उद्याचे हिरवे अंकुर जन्मणारच आहेत...
हा अर्थपूर्ण आत्मविश्वास ज्यांनी
माझ्या कंगाल अंत:करणात जाणीवपूर्वक
रूजवून माझ्या आयुष्यातल्या दीर्घ रात्रीच्या
काळोखाचं गाठोड ज्यांनी नि:संदेह मनाने
पाठीवर घेऊन स्वत: काळोखाशी मैत्री करून,
माझ्या पायदळी फक्त प्रकाशच प्रकाश
उधळत स्वत:च्या तळहातावरच्या रेषांना
पुसत माझ्या ललाटाला
आत्मसन्मान दिला त्या....”

आई-वडिलांना

माझं हे संशोधन कृतज्ञतापूर्वक समर्पित...!